मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# इंद्रायणी'ला आठवड्यापासून पुन्हा 'फेस'

## विधिमंडळात चर्चा होऊनही ठोस कार्यवाही दिसेना

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** इंद्रायणी नदीचा पुनरुज्जीवन आराखडा तयार आहे. नदी काठच्या गावांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्याचा 'डीपीआर' केंद्र सरकारकडे पाठवला आहे, असे प्रशासन व सरकारकडून सांगितले जात आहे. कार्तिकी वारीपूर्वी एक नोव्हेंबर रोजी नदीचे पाणी फेसाळले होते. त्यानंतर हिवाळी अधिवेशनात आमदारांनी लक्षवेधी मांडली. त्यावर मंत्र्यांनी उत्तर दिले. पुण्यात पंधरा दिवसांपूर्वी मंत्री व अधिकाऱ्यांची बैठक झाली. वारकऱ्यांनी परिक्रमा काढून लक्ष वेधले. पर्यावरणप्रेमी, वारकरी आवाज उठवत आहेत. तरीही प्रदूषणास कारणीभूत यंत्रणा आणि प्रशासनावर काहीही फरक पडलेला नाही, तसेच सरकारही ठोस पावले उचलताना दिसत नाही. कारण, गेल्या आठ दिवसांपासून दररोज नदी फेसाळते आहे. त्याचा वारकऱ्यांना त्रास होत आहे. पिंपरी-चिंचवड उद्योगनगरीसह पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील मावळ व खेड तालुक्यातील गावांसह चाकण, तळेगाव, निघोजे अशा औद्योगिक क्षेत्रातील रसायनयुक्त सांडपाणी मोठ्या प्रमाणात इंद्रायणी नदीत सोडले जात आहे. त्यामुळे नदीचे पात्र काळवंडले आहे. कार्तिकी वारीपासून सातत्याने प्रदूषण होत आहे. आता 'इंद्रायणी'चे संपूर्ण पात्रच फेसाळले आहे. आळंदी परिसरात नदीत बर्फाप्रमाणे फेस आलेला आहे. इंद्रायणीनगर व केळगावजवळील बंधाऱ्यापासून नदीत दुथडी फेस पसरलेला असतो. नदीच्या जवळून जातानासुद्धा पात्रातील



पाण्याला उग्र वास येत आहे. नाक मुठीत धरून चालावे लागत आहे.

**आळंदीतील सांडपाणीही नदीत**

गेल्या काही वर्षांपासून इंद्रायणीच्या उगमापासूनच विविध ग्रामपंचायती, नगरपरिषदा, औद्योगिक भागातील छोटेमोठे कारखाने, पिंपरी-चिंचवड औद्योगिक परिसर व महापालिका हद्दीतील चिखली कुदळवाडी भागातून रसायनयुक्त व मैलापाणी थेट नदीत सोडले जात आहे. परिणामी इंद्रायणीला गटाराचे स्वरूप आले आहे. बहुतांश ठिकाणी पाणी काळवंडलेले आहे. पाण्यावर फेसही मोठ्या प्रमाणात असतो. सातत्याने सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे इंद्रायणी बारमाही वाहत असते. मात्र, सगळीकडे सांडपाणीच आहे. आळंदी नगरपरिषद हद्दीतील सांडपाणीही नदीपात्रात सोडले जात आहे.

**'पीएमआरडीए'चे नियोजन**

'पीएमआरडीए'ने इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांतर्गत ८२ किलोमीटर अंतरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी डीपीआर (विकास आराखडा अहवाल) तयार केला आहे. तो रिव्हर कन्झर्व्हेशन डायरेक्टरेट यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. यामध्ये पीएमआरडीए हद्दीत २३ ठिकाणी एसटीपी प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. त्यासाठी सुमारे ५१५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, असे पीएमआरडीएचे अधिकारी सांगतात. असे असेल तर त्या डीपीआरला मंजुरी केव्हा मिळणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहरातील 'एमआयडसी'तील उद्योगांचे रासायनिक व औद्योगिक सांडपाणी वेगळ्या भूमिगत वाहिन्यांद्वारे एकत्र करायचे. ते 'सीईटीपी'त आणून त्यावर प्रक्रिया करायची असे प्राथमिक नियोजन आहे. सुमारे तीन हजारांवर लघुउद्योग सीईटीपीला जोडण्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये चाकण व तळेगाव एमआयडीसीचा भागही असेल. कोणती कंपनी कोणते रसायन वापरून सांडपाणी सोडते, याची माहिती संकलनाचे काम सुरू आहे. त्याचाही डीपीआर तयार करण्याचे महापालिकेचे नियोजन असल्याचे एका अधिकाऱ्यांनी सांगितले.

१ डिसेंबर : आळंदीतील कार्तिकी वारीपूर्वी अर्थात ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी दिन सोहळ्यापूर्वी नदीला मोठ्या प्रमाणात फेस १३ डिसेंबर : नागपूर हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी, २६ डिसेंबर : बालेवाडीत बैठक. इंद्रायणीत जाणारे दूषित पाणी तातडीने रोखून सांडपाणी व्यवस्थापनावर विशेष भर द्यावा, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिले.

# लोकशाही वृत्तवाहिनीचे प्रसारण ३० दिवस बंद करण्याचे आदेश

## ९ जानेवारी ६ वाजल्यापासून प्रसारण बंद करण्याचा आदेश

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** वृत्तवाहिनीचा परवाना पुढील ३० दिवस निलंबित करण्यात आला आहे. ३० दिवस चॅनेलचे प्रसारण बंद करण्याचे आदेश केंद्रीय माहिती आणि प्रसारण खात्याने दिले आहेत.केंद्रीय माहिती आणि प्रसारण खात्याने डेंझ शाही मराठी वृत्तवाहिनी आज ९ जानेवारी सायंकाळी ६ वाजल्यापासून बंद करण्याचा आदेश दिला आहे. लोकशाही मराठी वाहिनीच्या माध्यमातून सरकारच्या चुकीच्या धोरणावर स्पष्ट मत मांडले जात होते. लोकांपर्यंत सत्य जावे असा या वाहिनीचा प्रयत्न होता. अभिव्यक्तीचा घटनात्मक अधिकार हुकूमशाही पद्धतीने केंद्र सरकारने संपुष्टात आणण्याचा प्रयत्न केला आहे. हा





घटनाद्रोह, लोकशाहीद्रोह आहे.केंद्र सरकारच्या या हुकूमशाहीचा आम्ही तीव्र शब्दात निषेध व्यक्त करीत आहोत. लोकशाहीचे संपादक कमलेश सुतार व त्यांचे सर्व पत्रकार यांच्या समवेत आम्ही लोकशाही, संविधान वाचवण्यासाठी व लोकशाहीचे सक्षमीकरण व्हावे यासाठी खांद्याला खांदा लावून रस्त्यावरचा लढा आम्ही लढू, असे सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी म्हटले आहे.डेंझ शाही मराठी वृत्तवाहिनीचे संपादक कमलेश सुतार यांनी फेसबुकवर पोस्ट केली आहे. त्यात म्हटले आहे की, लोकशाही मराठीचा परवाना पुढील ३० दिवस निलंबित ! ३० दिवस चॅनेलचे प्रसारण बंद करण्याचे आदेश! लढेंगे जितेंगे दरम्यान, यापूर्वीही भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या विरोधातील बातम्या दाखविल्यानंतर तीन दिवस वाहिनी बंद ठेवण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाने स्थगिती उठविली होती.

# पिंपरीतून मुंबईकडे लाखो मराठा बांधव कूच करणार : सतीश काळे

## शहरात विविध ठिकाणी बैठकांतून समाज बांधवांचे नियोजन

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत गंभीर नसलेल्या राज्य सरकारला जाग आणण्यासाठी २० जानेवारीला मराठा बांधव मुंबईत धडकणार आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरामधून देखील लाखो मराठा बांधव कूच करणार असल्याची माहिती मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते सतीश काळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. मराठा आरक्षणाचा लढा आणखीन तीव्र करण्याचा निर्धार समाज बांधवांचा असल्याची माहिती काळे यांनी दिली.या आंदोलनात सहभागी होण्यासाठी शहरातील विविध भागात फिरून गणपती मंडळ, शहरातील विविध संघटनांच्या प्रतिनिधींना भेटून जनजागृती केली जात आहे. या मध्ये प्रकाश जाधव, वैभव जाधव, मिरा कदम, रावसाहेब गंगाधरे, संतोष शिंदे, संदिपराजे मुटकुळे, लहू लांडगे, गणेश कुंजीर, ज्योती जाधव, अशोक सातपुते, नकुल भोईर, सुरज ठाकर, कल्पना गिड्डे, सुनिता शिंदे, वसंत पाटील आदीसह विविध संघटनेचे पदाधिकारी या






आंदोलनात सहभागी होणार आहेत. सतीश काळे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत राज्य आणि केंद्र सरकार कोणताही ठोस, सकारात्मक निर्णय घेताना दिसत नाही. मराठा समाजाला दिलासा दिला जात नाही. त्याकडे लक्ष वेधण्यासाठी सातत्याने आंदोलनाचे हत्यार उपसावे लागत आहे. तरी देखील सरकारचे डोळे उघडत नाही. या उलट आंदोलनाला बदनाम करण्याची खेळी केली जात आहे. प्रत्येक वेळी वेगवेगळे आश्वासन देऊन मनोज जरांगे पाटील यांना उपोषण मागे घ्यायला लावले. मात्र दिलेल्या आश्वासनाला ते जागले नाहीत. त्याच्या निषेधार्थ आणि मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी मुंबईत जरांगे यांनी आमरण उपोषण छेडले आहे. त्याला शहरातून लाखो बांधव घेऊन जाऊन पाठिंबा देणार असल्याचे काळे यांनी सांगितले.मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरामधून देखील लाखो मराठा बांधव कूच करणार असल्याची माहिती मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते सतीश काळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. मराठा आरक्षणाचा लढा आणखीन तीव्र करण्याचा निर्धार समाज बांधवांचा असल्याची माहिती काळे यांनी दिली.

> **“ मनोज जरांगे पाटील यांचे नेतृत्वाखाली मुंबईत आमरण उपोषण करण्याचे ठरले आहे. त्याला पिंपरी चिंचवड शहरा-तून देखील आम्ही पाठिंबा देणार आहोत. शहरात जनजागृती करून मराठा बांधवांसह इतर सामाजिक संघटनांच्या लोकप्रतिनिधी सोबत चर्चा करण्यात आली आहे.शहरातून एक लाखांपेक्षा अधिक मराठा बांधव मुंबईत घेऊन जाण्याचा आमचा निर्धार आहे.**
>
> **– सतीश काळे.**

# उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करा

## मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा; जनसंवाद सभेत नागरिकांची मागणी

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार सर्व क्षेत्रिय कार्यालयांत करण्यात येते. सभेचे अध्यक्ष तथा मुख्य समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या मनपा क्षेत्रीय कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांना महापालिकेच्या अनुषंगाने असलेली कामे, अडचणी, तक्रारी, सूचना या सर्व बाबींची नोंद घेऊन संबधितांना या बाबतीत कार्यवाही करण्याच्या सूचना महापालिकेकडून दिल्या गेल्या आहेत. महापालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयांमध्ये काल पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी सहभाग घेऊन एकूण ५० तक्रारवजा



सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अनुक्रमे १३, ५, ३, ६, ५, ३, ४, आणि ११ तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या. अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, मनोज सेठीया, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, अजय चारठाणकर यांनी भूषवले. तसेच यावेळी क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, अण्णा बोदडे, डॉ. अंकुश जाधव, विनोद जळक, राजेश आगळे, सिताराम बहुरे, उमेश ढाकणे उपस्थित होते. काल पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. यामध्ये उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी आणि मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशा सूचनांचा समावेश होता. तसेच पाणीपुरवठा पुरेशा दाबाने करावा, रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम वेगाने करावे, शहर परिसरात वेळोवेळी किटकफवारणी करण्यात यावी, बसथांब्यांचे नुतनीकरण करण्यात यावे, खराब झालेल्या ड्रेनेज लाईन्स दुरूस्त करण्यात याव्यात या तक्रारी नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

# पुण्यात फक्त ३९८ अनधिकृत बांधकामे?

## ३ हजार ९१८ बांधकामांवर कारवाई



**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

शहरात अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले असताना आणि उपनगरांमध्ये बहुतांश ठिकाणी अनधिकृत बांधकामे असतानाही महापालिकेकडील आकडेवारीनुसार शहरात केवळ ३९८ अनधिकृत बांधकामे असल्याचे स्पष्ट झाले आहे. या बांधकामांमध्ये अनेक सदनिकांचा समावेश असून विशेष म्हणजे २०२२ मध्ये महापालिकेने ६ हजार १७९ बांधकामांना नोटिसा बजाविल्या होत्या. त्यापैकी ३ हजार ९१८ बांधकामांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती महापालिकेनेच सर्वसाधारण सभेत दिली होती. मात्र दोन वर्षांत शहरात केवळ ३९८ अनधिकृत बांधकामे असल्याने अनधिकृत बांधकामांची संख्या कमी कशी झाली, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, गेल्या काही वर्षांत अनधिकृत बांधकामांवरील कारवाई वेगाने सुरू आहे. त्यानुसार आतापर्यंत १६ लाख चौरस फुटांचे क्षेत्र मोकळे करण्यात आले आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकामांची संख्या कमी झाली आहे, असा दावा बांधकाम विभागाकडून करण्यात आला आहे. शहरातील अनधिकृत बांधकामांचे प्रमाण गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. उपनगरांमध्ये विनापरवाना बांधकामे करण्यात येत आहेत. आंबेगाव बुद्रुक परिसरातील अकरा अनधिकृत इमारतींवर महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाने कारवाई करत या सर्व इमारती जमीनदोस्त केल्या होत्या. मात्र, या इमारतीला दोन वर्षांपूर्वीच नोटीस बजाविण्यात आली होती. मात्र, कारवाई करण्यास टाळाटाळ झाल्याची बाब पुढे आली होती.

या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी शहर अभियंता आणि अतिरिक्त आयुक्त यांची समिती स्थापन केली असून, गेल्या तीन वर्षांतील अनधिकृत बांधकामांना दिलेल्या नोटिसा आणि त्यावर केलेली कारवाई याचा अहवाल मागविला आहे. त्याचा आढावा येत्या आठवड्यात घेण्यात येणार आहे.

यासंदर्भात प्रत्येक विभागाकडील अनधिकृत बांधकामांची माहिती घेण्यात आली असता शहरात केवळ ३९८ अनधिकृत बांधकामांवर कारवाई राहिली असल्याचे पुढे आले. ही सर्व बांधकामे शहराच्या जुन्या हद्दीतील असून समाविष्ट गावांतील अनधिकृत बांधकामांचा अद्याप यामध्ये समावेश नाही. तसेच पदपथ किंवा रस्त्यावर उभारण्यात आलेले बेकायदा शेड किंवा अन्य बांधकामांचा यामध्ये समावेश नाही. बांधकाम विभागाने शहराची सात विभागांत विभागणी केली आहे. बांधकाम विभागाची परवानगी न घेता केलेली बांधकामे तसेच नकाशे मंजूर नसताना केलेली बांधकामे अनधिकृत ठरविली जातात. त्यानुसार महापालिकेने ४९१ बांधकामांना नोटिसा बजाविल्या होत्या. त्यापैकी ९३ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत ३९८ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आलेली नाही. येत्या काही दिवसांत त्यावर कारवाई करण्यात येईल, असा दावाही बांधकाम विभागाकडून करण्यात आला. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील गावे महापालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आली. या गावांमध्ये २ हजार २२२ अनधिकृत बांधकामे असल्याची नोंद आहे. गावे महापालिका हद्दीत आल्यानंतर ४५५ बांधकामे हटविण्यात आल्याचा दावाही करण्यात आला आहे. विशेष म्हणजे महापालिकेच्या बांधकाम विभागाने २०२२ मध्ये शहरातील ६ हजार १७९ अनधिकृत बांधकामे असल्याचा आणि त्यापैकी ३ हजार ९१८ बांधकामांवर कारवाई केल्याचे लेखी उत्तर दिले होते. मात्र अनधिकृत बांधकामांची संख्या दोन वर्षांत झपाट्याने घटल्यामुळे खरच कारवाई झाली की अनधिकृत बांधकामांना अभय देण्यात आले, याची चर्चा सुरू झाली आहे.शहरात अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले असताना आणि उपनगरांमध्ये बहुतांश ठिकाणी अनधिकृत बांधकामे असतानाही महापालिकेकडील आकडेवारीनुसार शहरात केवळ ३९८ अनधिकृत बांधकामे असल्याचे स्पष्ट झाले आहे. या बांधकामांमध्ये अनेक सदनिकांचा समावेश असून विशेष म्हणजे २०२२ मध्ये महापालिकेने ६ हजार १७९ बांधकामांना नोटिसा बजाविल्या होत्या. त्यापैकी ३ हजार ९१८ बांधकामांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती महापालिकेनेच सर्वसाधारण सभेत दिली होती.

# पुणे महापालिकेची निवडणूक पुन्हा लांबणीवर

## मंगळवारी (९ जानेवारी) होणारी सुनावणी ४ मार्च रोजी होणार

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

सर्वोच्च न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात दाखल असलेल्या याचिकांवर मंगळवारी (९ जानेवारी) होणारी सुनावणी ४ मार्च रोजी होणार आहे. मार्च महिन्यात लोकसभेची निवडणूक होणार असल्याने आणि त्यानंतर लगेच विधानसभेसाठी निवडणूक होणार असल्याने महापालिकेच्या निवडणुका आणखी पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे इच्छुकांची निराशा झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल आहे. इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणासंदर्भातही याचिका दाखल आहे. या याचिकांवरील सुनावणी पुढे गेली असल्याने निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी होणारी सुनावणी ४ मार्च रोजी होणार आहे. त्यामुळे महापालिका निवडणूक घेण्याचा मार्ग खडतर





झाल्याचे दिसत आहे. शहरात गेल्या पावणेदोन वर्षापासून लोकप्रतिनिधी नाहीत. महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्या हातात महापालिकेचा कारभार आहे. महापालिका निवडणूक त्रिसदस्यीय की चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने होणार यावर निर्णय न्यायालयाच्या निकालानंतरच होणार आहे. महापालिकेची गेली पंचवार्षिक निवडणूक फेब्रुवारी २०१७मध्ये झाली होती. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला प्रथमच बहुमत मिळाले होते. भाजपचे तब्बल ९८ नगरसेवक या निवडणुकीत विजयी झाले होते. आगामी निवडणुकीतही शंभरपेक्षा जास्त नगरसेवक निवडून आणण्याचे उद्दिष्ट भाजपने ठेवले आहे. मात्र, राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर आणि प्रभागांची रचना कशी होते, यावर अनेक पक्षप्रवेश आगामी काळात होण्याची शक्यता आहे. त्यातच इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणावरही निवडणुकीतील राजकीय गणिते जुळविली जाणार आहेत. मात्र, सुनावणी लांबणीवर पडल्याने ही प्रक्रियाही थंडावली आहे. लोकसभा आणि त्यानंतर होणाऱ्या विधानसभा निवडणुकींनंतर महापालिका निवडणूक होणार असल्याने इच्छुकांच्या अपेक्षांवरही पाणी पडले आहे.

# कांदाबंदीवरून शेतकरी आक्रमक

## पंतप्रधानांच्या नाशिक दौऱ्यामध्ये एकत्रित निदर्शनांसाठी मोर्चेबांधणी



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नियोजित नाशिक दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर कांद्याच्या निर्यातबंदीविरोधात राज्यातील शेतकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत. कांद्यासह अन्य शेतीमालावरील निर्यातबंदी न उठविल्यास पंतप्रधानांच्या दौऱ्यात विमानतळ ते कार्यक्रम स्थळापर्यंत निदर्शने करण्यात येतील, असा इशारा संघटनांनी दिला आहे. स्वतंत्र भारत पक्ष, अखिल भारतीय किसान सभा, शरद जोशीप्रणीत शेतकरी संघटना, राजू शेट्टी यांची स्वाभिमानी शेतकरी संघटना, प्रहार आणि महाराष्ट्र राज्य कांदाउत्पादक संघटना यांनी पंतप्रधानांच्या दौऱ्यावेळी निदर्शने करण्याचा इशारा दिला आहे. पंतप्रधान नाशिक दौऱ्यावर येण्यापूर्वी केंद्र सरकारने कांद्याची निर्यातीवरील बंदी उठविली नाही, तर शेतकऱ्यांनी काळे झेंडे दाखवून निषेध करावा, असे आवाहन या संघटनांनी केले आहे. शेतकऱ्यांनी विरोध न केल्यास केंद्राच्या निर्णयाला शेतकऱ्यांचा पाठिबा असल्याचा समज होईल, असे मत स्वतंत्र भारत पक्षाचे अनिल घनवट यांनी व्यक्त केले. किसान सभेचे सरचिटणीस डॉ. अजित नवले, शरद जोशीप्रणीत शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अर्जुन बोराडे, शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनीही शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरून निषेध नोंदविण्याचे आवाहन केले आहे. सात डिसेंबरला कांद्यावर निर्यातबंदी लादल्यापासून शेतकऱ्यांचे १५०० ते १८०० रुपये प्रति क्विंटलचे नुकसान होत आहे. हा एकूण आकडा १५०० कोटींवर गेला आहे. हे नुकसान केंद्र सरकारने भरून द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कांदाउत्पादक संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केली. पंतप्रधान नाशिक येतात, तेव्हा दौऱ्याच्या एक दिवस आधी जिल्ह्यातील शेतकरी संघटनांच्या नेत्यांना स्थानबद्ध केले जाते. त्यामुळे नेते नसतील, तरी सर्वसामान्य कांदाउत्पादक शेतकऱ्यांनी निदर्शने करावीत, असे आवाहन या नेत्यांनी केले आहे. तर पोलीस प्रशासनाने मंगळवारी घेतलेल्या बैठकीत शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी पंतप्रधान मोदींची भेट घालून देण्याची मागणी केली आहे.

### १८०० रुपये क्विंटलचे नुकसान

» अखिल भारतीय किसान सभा, शरद जोशीप्रणीत शेतकरी संघटना, राजू शेट्टी यांची स्वाभिमानी शेतकरी संघटना, प्रहार आणि महाराष्ट्र राज्य कांदाउत्पादक संघटना यांनी पंतप्रधानांच्या दौऱ्यावेळी निदर्शने करण्याचा इशारा दिला आहे. पंतप्रधान नाशिक दौऱ्यावर येण्यापूर्वी केंद्र सरकारने कांद्याची निर्यातीवरील बंदी उठविली नाही, तर शेतकऱ्यांनी काळे झेंडे दाखवून निषेध करावा, असे आवाहन या संघटनांनी केले आहे. शेतकऱ्यांनी विरोध न केल्यास केंद्राच्या निर्णयाला शेतकऱ्यांचा पाठिबा असल्याचा समज होईल, असे मत स्वतंत्र भारत पक्षाचे अनिल घनवट यांनी व्यक्त केले. किसान सभेचे सरचिटणीस डॉ. अजित नवले, शरद जोशीप्रणीत शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अर्जुन बोराडे, शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनीही शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरून निषेध नोंदविण्याचे आवाहन केले आहे. सात डिसेंबरला कांद्यावर निर्यातबंदी लादल्यापासून शेतकऱ्यांचे १५०० ते १८०० रुपये प्रति क्विंटलचे नुकसान होत आहे. हा एकूण आकडा १५०० कोटींवर गेला आहे.

# शिक्षण विभाग वगळता अन्य कामे शिक्षकांना नको

## शासन नियुक्त समितीकडून अहवाल सादर



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या अशैक्षणिक कामांसंदर्भात राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीने आपला अहवाल सादर केला आहे. त्यानुसार राज्यातील शिक्षकांना शिक्षण विभाग सोडून अन्य विभागांची कामे देऊ नयेत, शालेय पोषण आहाराच्या अभिलेख्यांच्या कामासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी, अशा महत्त्वाच्या शिफारशी अहवालाद्वारे करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता या अहवालासंदर्भात शिक्षण विभाग काय धोरण निश्चित करणार, ही बाब महत्त्वाची ठरणार आहे. शिक्षण हक्क कायद्यातील कलम २७ नुसार शिक्षकांना अशैक्षणिक कामे लावण्यास परवानगी नाही. राष्ट्रीय दशवार्षिक जनगणना, निवडणूक आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळीच शिक्षकांना कामे देता येतात. मात्र शिक्षकांना वर्गात शिकवणे किंवा शैक्षणिक उपक्रमांव्यतिरिक्त जवळपास दिडशे कामे दिली जात असल्याचा आक्षेप आहे. त्यात प्रशासनाने दिलेली विविध कामे, अहवाल, सर्वेक्षणे आदींचा समावेश आहे. मात्र या अशैक्षणिक कामांमुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होत असल्याचे सांगत शिक्षक संघटनांनी या कामांना विरोध केला आहे. त्यामुळेच नवसाक्षरता अभियानातील निरक्षरांच्या सर्वेक्षणावरही शिक्षक संघटनांनी बहिष्कार घातला आहे. परिणामी या अभियानाचे काम पूर्ण क्षमतेने सुरू झालेले नाही.

या पार्श्वभूमीवर शिक्षकांच्या अशैक्षणिक कामांबाबत शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती. नुकत्याच झालेल्या विधिमंडळ अधिवेशनापूर्वी समितीने आपला अहवाल सादर केला. त्यात विविध शिफारशी करण्यात आल्या आहेत. निवडणूक आणि जनगणना ही कामे सोडून शिक्षकांना शिक्षण विभाग वगळता अन्य विभागांची कामे देऊ नयेत. शैक्षणिकदृष्ट्या आवश्यक असलेली कामे शिक्षकांना कराव्या लागतील. त्यात शिक्षण विभागाच्या अखत्यारितील कामे उदाहरणार्थ युडायस नोंदणी, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, शालेय पोषण आहार अशी कामे करावी लागतील.

> **“ शिक्षण विभागाच्या कामांपैकी अनेक कामे अशैक्षणिक आहेत. शिक्षण विभागाकडून अनेक प्रकारची माहिती मागवली जाते. ही माहिती सादर करण्याच्या कामाचा अध्यापनाशी काहीही संबंध नसतो. या कामांमध्ये वेळ जात असल्याने अध्यापनावर परिणाम होतो.**
>
> **– विजय कोंबे, राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**